# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

## दिनांकः09.03.2024 वारःशनिवार

---

1. देशाची संस्कृती, वारसा आणि परंपरा जगभरात पोहोचवण्याचं - नवसर्जन पुरस्कार सोहळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं आवाहन
2. महाराष्ट्रातील चार जिल्ह्यांमध्ये 152 मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांचा विकास होणार
3. गोवर-रुबेला निर्मूलनासाठी भारतीय आरोग्य मंत्रालयाचा अमेरिकेत गौरव
4. प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियानाअंतर्गत 7 हजार कोटी रुपयांचे प्रकल्प मंजूर आणि
5. फ्रेंच खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत सात्विक साईराज आणि चिराग शेट्टी जोडीची पुरुष दुहेरीत आगेकूच

**नवसर्जन**

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाचं नांव चिन्हांकित करण्याचं अर्थात भारताचं ब्रँडींग करण्याचं काम नवसर्जन करु शकतात असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्ली इथं काढले. पहिल्या राष्ट्रीय नवसर्जन पुरस्कार वितरण सोहळा काल भारत मंडमप इथं आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. सर्जनशील कलाकारांनी भारतीय पारंपरिक कथा, संस्कृती, वारसा आणि परंपरा जगसमोर मांडण्यासाठी मोहीम सुरु करावी असं आवाहन त्यांनी केलं. जागतिक स्तरावरील आपल्या श्रोत्यांकडून देशासाठी लाईक्स मिळवण्यासाठी राजदूत म्हणून काम करावं आणि देशांतर्गत उत्पादनांना ओळख मिळवून देण्यासाठी व्होकल फॉर लोकल या तत्वावर काम करुन स्थानिक उत्पादन जागतिक स्तरावर पोहोचवावीत आणि देशाच्या विकासासाठी मध्यस्थ म्हणून काम करावं असा आग्रह पंतप्रधानांनी कलाकारांना केला. सर्वोत्कृष्ट कथाकार पुरस्कार, वर्षातील सर्वोत्कृष्ट डिस्रप्टर, सेलिब्रिटी क्रिएटर, ग्रीन चॅम्पियन आणि सर्वोत्कृष्ट क्रिएटर फॉर सोशल चेंज अशा वीस श्रेणींमध्ये हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. या पुरस्कारांसाठी 20 विविध श्रेण्यांमधून दीड लाख नामांकनं आली होती. त्यातून विजेत्यांची निवड करण्यासाठी 10 लाख नेटकऱ्यांनी मतदान केलं होतं. शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या राज्यातील नमन देशमुख यांना नवसर्जन पुरस्कार देण्यात आला. पार्श्वगायिका मैथीली ठाकूर यांना या वर्षासाठी सांस्कृतिक राजदूत म्हणून घोषित करण्यात आलं आहे. तर मुंबईच्या मल्हार कळंबे याला स्वच्छता दूत म्हणून यावेळी गौरवण्यात आलं.

**पीएम आसाम**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आसाम मध्ये 18 हजार कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी दूरस्थ पद्धतीनं करणार आहेत. तसंच अरुणाचल प्रदेशमध्ये विकसित भारत-विकसित उत्तर-पूर्व कार्यक्रमात ते सहभागी होणार आहेत.आज दुपारी पंतप्रधानांच्या हस्ते होलोन्गा पाथर इथे महान योद्धा लचीत बोरफुकान यांच्या 84 फुट उंच प्रतिमेचं अनावरण होणार आहे.

**एसजेव्हीएन**

भारत सरकारच्या उर्जा मंत्रालयाअंतर्गत महाराष्ट्रातील 1352 मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांच्या विकासासाठी एसजेव्हीएन लिमिटेड या सार्वजनिक क्षेत्रातील संस्थेची निवड झाली आहे. हे प्रकल्प एसजेव्हीएन ग्रीन एनर्जी लिमिटेड या एसजेव्हीएन च्या उपसंस्थेमार्फत राज्यातील नाशिक, सोलापूर, अहमदनगर आणि पुणे या चार जिल्ह्यांमध्ये विकसित केले जातील. हे सौर प्रकल्प महाराष्ट्र सरकारच्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना 2 अंतर्गत विकसित केले जातील अशी माहिती या

संस्थेच्या अध्यक्षा आणि व्यवस्थापकीय संचालक गीता कपूर यांनी गुरुवारी मुंबईत दिली. यावेळी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत एसजेव्हीएनला पुरस्कार पत्र देण्यात आलं. या प्रकल्पांच्या विकासासाठी सुमारे 7 हजार 436 कोटी एवढी एकंदर गुंतवणूक करण्यात येणार आहे. वर्ष 2030 पर्यंत 25 हजार मेगावॅट सौरउर्जा निर्मिती करण्याचं आणि वर्ष 2040 पर्यंत 50 हजार मेगावॅट क्षमतेची सौरउर्जा निर्मितीचं उद्दिष्ट आहे. 2030 पर्यंत भारताच्या एकंदर उर्जा क्षमतेच्या 50% क्षमता जीवाश्म-इंधन-आधारित ऊर्जा स्त्रोतांपासून निर्माण करण्याच्या भारत सरकारच्या वचनबद्धतेच्या अनुषंगानं हे ध्येय ठरवण्यात आलं आहे.

**जनजाती**

गेल्या 3 महिन्यात प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियानाअंतर्गत 7 हजार कोटी रुपयांचे प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. जनजाती विकास मंत्रालयानं नऊ विविध विभागांअंतर्गत  सुमारे 24 हजार कोटी रुपयांचं तरतूद असलेले पीएम-जनमन प्रकल्प मंजूर झाले आहेत. आदिवासींना सुरक्षित घरं, शुद्ध पिण्याचे पाणी, शिक्षण, आरोग्य आणि पोषण, वीज, रस्ते आणि दूरसंचार आणि शाश्वत उपजीविकेच्या मूलभूत सुविधां उपलब्ध करणं आणि त्यांचा सामाजिक-आर्थिक स्तर सुधारणं हा यामागील उद्देश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी असुरक्षित आदिवासी गटांच्या सामाजिक-आर्थिक कल्याणासाठी गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये पीएम-जनमन अभियान सुरू केलं होतं.

**पाकिस्तान निवडणुक**

पाकिस्तानमध्ये आज राष्ट्रपतीपदासाठी निवडणुका होणार आहेत. अध्यक्षपदासाठी प्रमुख लढत पाकिस्तान पीपल्स पार्टी आणि पाकिस्तान मुस्लिम लीग यांचे संयुक्त उमेदवार, माजी राष्ट्रपती आसिफ अली झरदारी आणि सुन्नी इत्तेहाद कौन्सिलचा पाठिंबा असलेले नवाज आणि महमूद अचकझाई यांच्यात आहे. ग्रँड डेमोक्रॅटिक अलायन्स जीडीए नं होणाऱ्या राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीतून माघार घेत असल्याची घोषणा केली आहे.

**गोवर-कांजिण्या**

गोवर आणि रुबेला या आजाराचं निर्मूलनासाठी भारतानं केलेल्या प्रयत्नांकरता अमेरिकन रेड क्रॉस संस्थेनं भारतीय आरोग्य मंत्रालयाचा गौरव केला आहे. गेल्या 6 मार्च रोजी वॉशिंग्टन इथं अमेरिकन रेड क्रॉस मुख्यालयात आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या वतीनं राजदूत श्रीप्रिया रंगनाथन यांनी हा पुरस्कार स्वीकारला. अशी माहिती आरोग्य मंत्रालयानं जारी करण्यात आलेल्या निवेदनांत देण्यात आली आहे. हा पुरस्कार सार्वजनिक आरोग्याप्रती देशाची बांधिलकी आणि मुलांमध्ये या संसर्गजन्य आजाराचा प्रसार रोखण्यासाठी केलेल्या कामाची पावती आहे. अनेक आव्हानांचा सामना करूनही, भारतानं गोवर आणि रुबेला संसर्ग कमी करण्यात यश मिळवलं. नियमित रबवलेलं जागृती अभियान आणि व्यापक लसीकरणामुळं या आजारांचा उद्रेक रोखण्यात उल्लेखनीय प्रगती दर्शविली आहे. असं या निवेदनांत म्हटलं आहे.

**नेपाळ- युपीआय**

भारताच्या युनिफाईड पेमेंटस इंटरफेस अर्थात युपीआयची सुविधा आता नेपाळमध्ये दिली जाणार आहे. NPCI ची उपकंपनी आंतरराष्ट्रीय पेमेंट लिमिटेड आणि नेपाळची फोनपे पेमेंट सुविधेनं भारताच्या UPI सेवेला मान्यता दिली आहे. भारत आणि नेपाळमधील नागरिकांना आर्थिक व्यवहारांसाठी UPI आता थेट वापरता येणार आहे. यामुळे नेपाळला जाणाऱ्या भारतीय पर्यटकांना लाभ मिळणार आहे. UPI आणि नेपाळची फोनपे दोन्ही देशांमधील QR-कोड-आधारित व्यक्ती-ते-व्यापारी अर्थात (P2M) व्यवहार सोप्या आणि सुलभ व्यवहारांसाठी सज्ज आहेत. नेपाळमध्ये 30% पर्यटक हे भारतीय आहेत.

**रशियन सैन्यभरती-फसवणूक**

रशियन सैन्य भरती संदर्भात भारतीय नागरिकांची फसवणूक झाल्याचा मुद्दा भारतानं रशियन सरकारपुढे गांभिर्यानं मांडला आहे. अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी काल नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांना संबोधित करताना दिली. नोकरीचं अमिष दाखवून भारतीय नागरिकांची भरती करणारे मध्यस्थ आणि संबंधित फसव्या संस्थांविरोधात कारवाई सुरू करण्यात आली आहे. या प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागानं काल अनेक शहरांमध्ये छापे टाकले. यामध्ये नोकरीच्या

नावाखाली मानवी तस्करी झाल्याची बाब समोर आली आहे. या मध्यस्थाविरुद्ध मानवी तस्करी विरोधी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आल्याचं जयवाल यांनी सांगितलं. रशियन सैन्यात नोकरी देण्याच्या अमिष दाखवणाऱ्या भुलथापांना भारतीय नागरिकांनी बळी पडू नये असं आवाहनही त्यांनी यावेळी केलं.

**<u>कृषीकेंद्र</u>**

देशातील शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि सक्षमीकरणासाठी एकात्मिक नियंत्रण कक्ष सुरु करण्यात आला आहे. नवी दिल्ली इथल्या कृषी भवनात सुरु करण्यात आलेल्या या केंद्राचं उद्घाटन काल केंद्रीय कृषी मंत्री अर्जुन मुंडा यांच्या काल हस्ते झालं. देशभरातील शेतकऱ्यांना स्वावलंबी करण्यासाठी मंत्रालयाचा हा एक नवीन उपक्रम आहे असं मुंडा यावेळी म्हणाले. शेतकऱ्यांना शेतीमधील वास्तवाची माहिती देणे आणि कृषी क्षेत्रातील खरी आव्हाने कोणती आहेत हे जाणून घेणे हा या नव्या उपक्रमाचा उद्देश आहे.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि इंग्लंड यांच्यात धर्मशाला इथं सुरू असलेल्या पाचव्या आणि अंतिम क्रिकेट कसोटी सामन्यात कर्णधार रोहित शर्मा आणि शुभमन गिल यांच्या शतकी आणि सर्फराज खान तसच देवदत्त पड्डीकल यांच्या अर्धशतकी खेळाच्या जोरावर काल दुसऱ्या दिवसाखेर भारताच्या 8 बाद 473 धावा झाल्या आहेत. भारताकडे एकंदर 255 धावांची आघाडी झाली आहे. इंग्लंड कडून शोएब बशीर ने 4 बळी मिळवले.

**<u>बॅडमिंटन</u>**

पॅरिस इथं सुरु असलेल्या फ्रेंच खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनं पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. काल झालेल्या उपांत्यपूर्व फेरीत सात्विक आणि चिरागनं थायलंडच्या सुपाक जोमकोह आणि किटिनुपोंग केद्रेन या जोडीचा 21-19, 21-13 असा पराभव केला. उद्या पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत या जोडीचा यांचा सामना दक्षिण कोरियाच्या सिओ सेऊंग जे आणि कांग मीन हायक या जोडीशी होणार आहे.

पुरुष एकेरीत लक्ष्य सेननंही सिंगापूरच्या लोह कीन युचा 9-21, 21-15, 21-13 असा विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला. महिला दुहेरीत ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांना चीनच्या चेन किंग चेन आणि जिया यी फॅन या जोडीकडून 21-18, 21-7 असा पराभव पत्करावा लागला. तत्पूर्वी, पीव्ही सिंधूलाही महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत चीनच्या चेन यू फी हिच्याकडून 24-22, 17-21, 18-21 असा पराभव पत्करावा लागला.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार